जळगाव ११ (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात इरास्मस प्लस प्रकल्पांतर्गत क्षमता विकसन केंद्र सुरु झाले असून या केंद्राचे उदघाटन गुरुवारी कुलगुरु प्रा. पी.पी. पाटील यांच्या हस्ते झाले.

युरोपियन युनियनच्या इरास्मस प्लस योजनेअंतर्गत भारतीय उच्च शिक्षणातील शिक्षकांच्या गुणवत्तेचा स्तर वाढविण्यासाठी क्षमता विकसन केंद्र स्थापन करण्यासाठी पोलंड, पोर्तुगाल, सायप्रस, स्लोव्हाकिया व बेल्जीयम या देशातील प्रत्येकी एक आणि कबचौउमविसह भारतातील पाच अशा दहा विद्यापीठांना तीन वर्षांसाठी सात कोटी रुपये मंजूर झाले आहेत. विद्यापीठाने याबाबतीत सामंजस्य करार केला असून विद्यापीठ कॅम्पसवरील विविध प्रशाळांच्या शिक्षकांना यापूर्वी तीनवेळा प्रशिक्षण देण्यात आले आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात या संदर्भातील क्षमता विकसन केंद्र गुरुवार पासून सुरु झाले. शिक्षणशास्त्र विभागाच्या नवीन इमारतीत अत्यंत सुसज्ज व अत्याधुनिक उपकरणांसह सुरु झालेल्या या केंद्राचे उदघाटन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी कॅबसिन प्रकल्प व्यवस्थापक पोलंड येथील डॉ.कामिला लूडविकोवस्का, प्राचार्य अनिल राव, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील या कॅबसिन प्रकल्पाचे विद्यापीठ समन्वयक प्रा.ए.एम.महाजन, प्र.वित्त व लेखा अधिकारी सोमनाथ गोहिल उपस्थित होते.

या उदघाटनानंतर सिनेट सभागृहात झालेल्या कार्यशाळेत बोलतांना डॉ.कामिला लूडविकोवस्का यांनी सविस्तरपणे कॅबसिन प्रकल्पाविषयी माहिती दिली. युरोप आणि भारतातील उच्च शिक्षणातील चांगल्या कल्पनांची देवाण घेवाण, शिक्षणातील अद्ययावत पध्दतीवर चर्चा करणे, शिक्षकांना प्रशिक्षण देणे त्यांच्यातील क्षमतांचे विकसन करणे, शिक्षणात तंत्रज्ञानाचा अधिक वापर करणे हे या प्रकल्पात अपेक्षित असून त्या पध्दतीचे प्रशिक्षणाचे काही टप्पे पूर्ण झाल्याचे डॉ.कामिला यांनी सांगितले. प्राचार्य अनिल राव यांनी आपल्या भाषणात प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये कोणत्या न कोणत्या क्षमता असतात त्या क्षमता शिक्षकांनी ओळखाव्यात व त्या बाबतीतील एखादे मोडयुल विकसित करावे असे आवाहन केले. अलिकडे शिक्षणाची पध्दत बदलत असून विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामध्ये संवाद होणे गरजेचे आहे. माहितीच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना शिक्षकांनी ज्ञान देणे गरजेचे आहे. विद्यार्थी आता बहुसांस्कृतिक झाला आहे. त्यामुळे हा बहुसांस्कृतिक दृष्टिकोन शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये येणे गरजेचे असल्याचे श्री.राव म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी शिक्षकांमध्ये व्यावसायिक कौशल्य येणे गरजेचे असून या केंद्रामार्फत ते कौशल्य निश्चितच अधिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आणले जातील अशी अपेक्षा व्यक्त करुन या केंद्राला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्र-कुलगरु प्रा. पी.पी. माहुलीकर यांनी उच्चशिक्षणातील गुणवत्ता वाढीत विद्यापीठातील हे केंद्र महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे सांगून रुसा मार्फत या केंद्रात दिल्याजाणाऱ्या सुविधांची माहिती दिली. समन्वयक प्रा.ए.एम.महाजन यांनी प्रास्ताविकात या प्रकल्पाची व गेल्या दिड वर्षात प्रकल्पांतर्गत राबविलेल्या उपक्रमांची माहिती दिली. गुणवत्ता वाढीसाठी हे केंद्र ऐतिहासिक ठरेल असा विश्वास प्रा.महाजन यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.भूषण चौधरी यांनी केली. डॉ.रमेश सरदार यांनी आभार मानले. या प्रकल्पात प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

बातमी क्र.२

जळगाव ११ (      ) स्वच्छ भारत समर इंटर्नशिप प्रोग्राम २०१९ करीता विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन नोंदणी सुरु करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या मनुष्य बळ विकास मंत्रालय व केंद्र शासनाच्या युवा व खेळ मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने ५० तासांचा स्वच्छ भारत समर इंटर्नशिप प्रोग्राम २०१९ चे आयोजन करण्यात आले आहे. याचा कालावधी दि.१० जून २०१९ ते ३१ जुलै, २०१९ असा आहे. या प्रोग्राममध्ये सहभागी होण्यासाठी http://sbm.gov.in/SBSI२०१९

या संकेतस्थळावर (पोर्टल) विद्यार्थ्यांनी ई-पध्दतीने नोंदणी (ऑनलाईन रजिस्ट्रेशन) करावयाचे आहे. या प्रोग्राम करीता ग्रामीण भागात प्लॅस्टिकमुक्त वातावरण, त्याची खतनिर्मिती आणि व्यवस्थापन ही थीम असून यशस्वी विद्यार्थ्यांना शासनाकडून पारितोषिक दिले जाणार आहे अधिकाधिक विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे. नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांची माहिती nssmantralaya@gmail.com, nssrcpune@gmail.com आणि एक प्रत nss@nmu.ac.in या ई-पत्त्यावर पाठवावी असे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.पंकजकुमार नन्नवरे यांनी कळविले आहे.

---

बातमी क्र.३

जळगाव ११ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विधी प्रशाळेतील बायो फॉरेनसिक लॉ ॲण्ड बायो टेरेरीझम लॉ अभ्यासक्रम, मेडीकल ज्युरीस्प्रूडन्स ॲण्ड टेक्सिकोलॉजी अभ्यासक्रम आणि इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राईटस या तीन अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस दि.१९ जुलै, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

वरील तीनही अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता प्रवेशास मुदतवाढ मिळावी अशी मागणी सतत विद्यार्थ्यांकडून होत असल्याने ही मुदतवाढ देण्यात आली आहे असे विद्यापीठाच्या विधी प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ.एस.आर.भादलीकर यांनी कळविले आहे.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ११ जुलै, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

(डॉ.सुनील पाटील)